आवृत्ती दि. २७-०९-२००९

लोकमत मंथन

# अमेरिकेत 'दुर्गा झाली गौरी'



'दुर्गा झाली गौरी' या नृत्यनाट्याशी माझ्या लहानपणाच्या खूप सुंदर आठवणी जोडल्या गेलेल्या आहेत. कथ्थक शिकत असताना मी ते पाहिलं होतं आणि आपणही कधीतरी हे नृत्यनाट्य बसवायचं असं मनात होतं. पण ते स्वप्न अमेरिकेतल्या 'बे एरिया'त साकार होईल असं वाटलं नव्हतं. 'दुर्गा झाली गौरी' हे नृत्यनाट्य बसवताना माझ्या पोतडीत नव्या काही आठवणी जमा झाल्या आणि हे नाटक बसवणं हाच एक यादगार अनुभव बनला.

'बे एरियात' ४ ते ५० वर्षे वयोगटातले कलाकार या नाटकासाठी मिळवणं हेच एक आव्हान होतं. पण बघता बघता ते जमले, उन्हाळ्याच्या सुट्टीत रोज चार तास मुले येऊ लागली. वय वर्षे ४ ते १४ वयोगटातल्या या मुलांनी मात्र आमची अक्षरशः परीक्षाच पाहिली. त्यांना काम करण्यात रस होता, पण मी सांगतेय तसं करा असं ऐकायला कुणीच तयार नव्हतं. प्रत्येकाच्या अक्षरशः हजारो शंका आणि प्रश्न. त्याची त्यांना पटतील अशी उत्तरं देणं अवघड होतं. कारण मी त्यांना एका अशा देशातली, त्या देशातल्या राजा-राणीची, राजकन्येची, गावकऱ्यांची गोष्ट सांगत होते जी त्यांनी कधी ऐकली नव्हती. भारतातलं खेडं दिसतं कसं, तिथं लोक जगतात कसे हे या मुलांनी पाहिलंही नव्हतं. त्यांचं सगळं जग डिस्नेच्या कार्टुनचं. टॉम ॲण्ड जेरी-मिकी माऊस पाहणाऱ्या या मुलांना राजकन्येची गोष्ट सांगणं अवघड होतं. कारण त्यांची राजकन्याही डिस्नेची प्रिन्सेस होती, तीच त्यांच्या आवडीची.

पहिल्यांदा त्यांना समजावी म्हणून 'दुर्गा झाली गौरी'ची गोष्ट इंग्रजीत सांगितली तर त्यात या मुलांना काही 'इंटरेस्टिंग' वाटेचना.

प्रिन्सेसची गोष्ट, तर मग ती दिसते कशी? कॉस्च्युम कोणते घालते? असे प्रश्न आमच्यावर येऊन आदळायला लागले. फार चर्चा करण्यापेक्षा त्यांना काही चित्रं दाखवली तर सोपं होईल असा विचार करून आम्ही त्यांना अमर चित्रकथेतले काही फोटो दाखवले. पण ते फोटो पाहताच एक धिटुकली चटकन म्हणाली, 'असे कसे फनी कपडे घातलेत यांनी, ही प्रिन्सेसही कित्ती फनी दिसतेय !'

हे कमीच होतं. सगळे जणं अडून बसले ते त्या विदुषकावर. त्यांच्यापैकी कोणालाच तो विदूषक फनी वाटत नव्हता. सगळ्यांचं एकच मत की 'हा जोकर नाहीच, आणि जो आहे तो अजिबात फनी दिसत नाही, त्यामुळे प्रिन्सेस त्याला पाहून हसूच शकत नाही !'

विदूषक म्हणजे जोकर आणि जोकर म्हणजे त्याचं नाक लालेलाल असतंच हे या मुलांच्या डोक्यात इतकं घट्ट बसलं होतं की ते काढून तिथं हा 'भारतीय' विदूषक ठेवणं महाअवघड.

आपल्या राजकन्येच्या जगात आणि आपल्या लहानपणच्या गोष्टीत या मुलांना घेऊन जाणं खूप अवघड होत होतं. जसजसे आम्ही त्यांना समजावत होतो तसतसे त्यांचे प्रश्न वाढत होते.

म्हणून मग आम्ही न वैतागता, त्यांच्या प्रश्नांची उत्तरं देत राहिलो. त्यातून जुन्या गोष्टी, त्यातलं जग, रोजचं

जगणं हे सारं समजावत राहिलो. विशेष म्हणजे या मुलांचं समाधान झालं की ते उत्साहानं ते करायला लागत. पण हा एवढा मोठा सांस्कृतिक फरक समजावून सांगणं हेच मोठं दिव्य होऊन बसलं होतं.

एक दिवस एक मुलगी आली. म्हणाली, 'मी नाही होणार व्हिलेज गर्ल, व्हिलेजमधल्या मुली शाळेत जात नाहीत.'

तिला समजावून सांगावं लागलं की, 'बाई ग, असं काही नसतं. आता खेड्यातल्या मुलीही शाळेत जातात. खूप शिकतात. भारतातल्या खेड्यात शाळा असतात.. इ. इ.' तेव्हा कुठं ती शांत झाली.

असाच एक मुलगा. त्याच्या डोक्यात हे काही केल्या शिरेना की गोष्टीतली राजकन्या हरवतेच कशी? तिला घरी फोन नाही का करता येत? आणि तिच्याकडे मोबाईल नसतो का जीपीएस वापरून तिला परत घरी नाही का येता येत?

सगळ्यात शेवटच्या प्रसंगात तर मोठा यक्षप्रश्न निर्माण झाला. एका मुलाला पडलेला प्रश्न सगळ्यांनी उचलून धरला की 'गावातल्या लोकांनी स्वतः का धरण बांधायचं? मग लोक टॅक्स भरतात त्याचं सरकार करतं काय? लोकांनी सरकारला विचारायला हवं ना की, 'टॅक्सचे डिटेल्स दाखवा.. ?'

नृत्यनाट्यापेक्षा अशी सामाजिक-सांस्कृतिक चर्चाच खूप रंगली. आपल्या समाजजीवनाचा एवढा मोठा पैस या मुलांना समजावून सांगणं आणि तो ही त्यांच्याच भाषेत हे फार कठीण होतं.

पण हळूहळू ते जमलं. तीन आठवड्यांचं सलग वर्कशॉपच आम्ही घेतलं. मग मुलं त्यात रमू लागली. आणि दुर्गा झाली गौरी साकार होत गेलं. बे एरियामधे गेली आठ वर्षे नाट्य-नृत्य-संगीत जोपासनेसाठी काम करणाऱ्या 'कला' या संस्थेनं निर्मितीची जबाबदारी घेतली आणि विक्रम वाटवे यांनी दिग्दर्शन करण्याचं स्वीकारलं आणि माझ्यावरचा मोठा भार हलका झाला..!

हे नृत्यनाट्य म्हणजे लहान-मोठ्या अमेरिकन प्रेक्षकांची मानसिकता लक्षात घेऊन स्वतंत्रपणे साकारलेला एक प्रयोग आहे.

पण या प्रयोगात दुर्गा झाली गौरीचा नवाच प्रवास मला उलगडत गेला..भारतीय तरी अमेरिकन वळणाचा !

- मोनिका मुटाटकर

बे एरिया, कॅलिफोर्निया